आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि.

दिनांक : 09.11.2026 **वार : सोमवार**

---

1. दीपावलीच्या मंगल पर्वातील नरकचतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाचा सण राज्यात सर्वत्र उत्साहात
2. पंतप्रधानांनी छत्तीसगडमध्ये बस्तर इथं सीआरपीएफच्या जवानांबरोबर साजरी केली दिवाळी
3. सशस्त्र नक्षलवादाचा अंत झाला असला तरी; वैचारिक नक्षलवादाचं आव्हान कायम असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
4. फळबागांसाठी बोअरवेल वरील बंदी शिथिल केल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
5. राज्याच्या विविध मंत्र्यांनीही सामाजिक भान जपत साजरी केली दिवाळी आणि
6. राज्यातील धरणांच्या पाणी साठ्यात गेल्या वर्षाच्या तुलनेत 25 टक्क्यांची घट

दीपावली-शेअर

दीपावलीच्या मंगल पर्वातील नरक चतुर्दशी आणि लक्ष्मी पूजनाचा सण काल राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. व्यापारी आस्थापना, छोटी मोठो दुकानं, विविध कार्यालयं आणि घराघरात संध्याकाळी विधिवत लक्ष्मीपूजन करण्यात आलं. रंगीबेरंगी आकाशदिवे, आकर्षक रोषणाई, पणत्या, रांगोळ्या आणि फटाक्यांची आतषबाजी असं उत्सवी वातावरण काल सर्वत्र पाहायला मिळालं.

लक्ष्मीपूजनाच्या निमित्तानं शेअर बाजारात काल मुहूर्ताचे सौदेही पार पडले. या विशेष सत्रात दोन्ही प्रमुख शेअर बाजारांच्या निर्देशांकांत घट नोंदवण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा सेंसेक्स 29 अंकांनी घसरून 80 हजार 999 वर बंद झाला; तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी 44 अंकांनी घसरून 24 हजार 986 अंकांवर बंद झाला.

मोदी-बस्तर

देशाने नक्षलवाद आणि माओवादी दहशतवादाविरुद्धची अनेक दशकांची लढाई जिंकली आहे, लाखो शूर वीर जवानांच्या योगदानामुळेच हे शक्य झालं, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. दरवर्षी प्रमाणे यंदाही जवानांबरोबर दिवाळी साजरी करण्याची आपली परंपरा पंतप्रधानांनी कायम राखली, छत्तीसगडमधील बस्तर इथं काल जवानांच्या समवेत दिवाळी साजरी केल्यानंतर मोदी यांनी त्यांना संबोधित केलं. ते म्हणाले.....

हिमालय की गोद में कारगिल से लेकर लेपचा तक, समंदर किनारे सरक्रीक से लेकर, समंदर की गोद में INS-विक्रांत तक, वीर जवानों के साथ हर दिवाली मेरे लिए यादगार रही है। मेरे वीर जवानों, इस बार मैं दिवाली मनाने बस्तर के जंगलों में आया हूँ। ये वो भूमि है, जहां कभी नक्सली आतंक का कहर था और आप सबकी त्याग-तपस्या के कारण उसी भूमि पर आज नक्सली आतंक का कहर खत्म हुआ, विकास की बहार शुरू हो गई।

देशातील प्रत्येक जिल्हा नक्षलवादापासून मुक्त झाला असून, कोट्यवधी नागरिक आता डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी हिंसेच्या दहशतीपासून मुक्त झाले आहेत; सशस्त्र नक्षलवादाचा अंत झाला असला तरी; वैचारिक नक्षलवादाचं आव्हान कायम असल्याचं पंतप्रधान म्हणाले. गेल्या वर्षभरात कर्तव्यावर असलेल्या सीआरपीएफच्या एकाही जवानाला आपला जीव गमवावा लागला नाही; गेल्या 47 वर्षांत हे पहिल्यांदाच घडलं, देशाचा दृढ निश्चय आणि ठोस धोरणांचा हा विजय आहे, असं मोदी म्हणाले.

देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी बलिदान देणाऱ्या सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी, राज्य पोलीस दल, यासह विविध सुरक्षा दलांच्या प्रत्येक जवानाप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. गेल्या बारा वर्षांत देशाने नक्षलवाद आणि फुटीरतावादाबरोबरच गरिबीविरुद्धच्या लढाईही जिंकली आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

मुख्यमंत्री-नागपूर

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासह चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जी गावे मदत करतील त्यांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल. अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी यंदाची दिवाळी नागपूर जिल्ह्यातील लोहारी सावंगा या गावात शेतकऱ्यांच्या बरोबर साजरी केली; या गावात त्यांनी मुक्काम करत शेतकरी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधी दुष्काळाच्या परिस्थितीत जागरुकपणे काम करत आहेत. गावात पिण्याचं पाणी, गुरांचा चारा आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देत आहेत. याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं.

नवीन बोरवेल बंदीबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, 15 डिसेंबर पर्यंत शेतकऱ्यांच्या फळबागांमध्ये ओल कायम ठेवण्यासाठी बोरवेल वरील बंदी उठवण्यात आली आहे. मे महिन्यापर्यंत हे पाणी पुरवायचं आहे; आणि फळबागाही जगवायच्या आहेत, त्यामुळे हा निर्णय घेत असल्याचा त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.....

फळबागा आहेत, आणि आता जर त्या फळबागांना आपण वाचवलं नाही, तर ही झाडं पुन्हा त्या लेव्हल ला येण्याकरता दहा बारा वर्ष लागतात. आणि म्हणून अशा भागांमध्ये जिथे काही काळापर्यंत ही बंदी उठवणं शक्य आहे, त्या ठिकाणी आम्ही ती उठवणार आहोत. ती सरसकट उठवली जाणार नाहीये. फक्त ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या फळबागा आहेत, त्याच ठिकाणी ही बंदी पंधरा डिसेंबर पर्यंत आम्ही उचलणार आहोत. त्याच्यावरही आमची करडी नजर असेल प्रशासनाची, कारण आपल्याला भूगर्भातलं पाणी हे पुरवायचं आहे. आणि मे महिन्यापर्यंत आपल्याला ते पुरवायचं आहे. त्यामुळे एक खास बाब म्हणून फळबागा वाचवण्याकरता हा निर्णय आपण घेतलेला आहे. फ्लशिंग हे परमनेंट एलोव्ड आहे. फ्लशिंग कधी करता येतं फ्लशिंग वर बंदी नाहीच. केवळ खोलीकरणावर बंदी आहे तीही काही काळ आपण उचलतो.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसमवेत दिवाळी साजरी करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या कृतीचं पंतप्रधान नरेंद्र मोदी कौतुक केलं आहे. तर हा सेवा भाव आपण पंतप्रधान नरेंद्र मोदींकडूनच घेतला असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

विविधमंत्री-दिवाळी

राज्यातील विविध मंत्र्यांनी काल सामाजिक भान जपत दिवाळी साजरी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'नंदनवन' या निवासस्थानी आयोजित स्नेहमेळाव्यात त्यांनी काल दिव्यांगांसोबत दिवाळी साजरी केली. दिव्यांग बांधवांच्या पाठीशी उभे राहणे हे आमचं कर्तव्यच आहे. आजच्या या कार्यक्रमाने माझी खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

नांदेड

उद्योगमंत्री डॉक्टर उदय सामंत यांनी नांदेड जिल्ह्यात सायाळ या गावातील शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांसोबत दिवाळी साजरी केली. डॉ. सामंत यांनी ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांसोबत दिवाळी फराळाचा आस्वाद घेतला.

यवतमाळ

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी कळंब तालुक्यातील गणेशवाडी येथील कोलाम पोडाला भेट देत आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली.

यवतमाळ

राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी यवतमाळच्या पुसद तालुक्यातील गौळ मांजरी, चिलवाडी, भगतवाडी आणि श्रीरामपुर इथं शेतकरी कुटुंबं निराधार मुलांसोबत उत्साहात दिवाळी साजरी करत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

मुंबई

मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी गोरेगाव येथील आरे दुग्ध वसाहत परिसरातील खांबांचा पाडा येथे आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली.

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी शिवगड तांडा इथं शेतकरी कुटुंबांसोबत दिवाळी साजरी केली. शिरसाट यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील गरजू शेतकरी कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या शिध्याचे वाटप करण्यात आले. राज्यभरातील अनेकांनी हे सण साजरे करताना त्याला सामाजिक बांधिलकीचीही जोड दिली.

बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील कदमापूर इथल्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी उपक्रम राबविला आहे. या विद्यार्थ्यांनी भारतातील प्रमुख 17 वेगवेगळ्या प्रादेशिक भाषांमध्ये सर्व देशवासीयांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा देत देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेचे आणि विविधतेतील एकतेचे एक सुंदर दर्शन घडविलं. शाळेतील शिक्षक राजेश कोगदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा उपक्रम पार पाडला.

गडचिरोली

गडचिरोली जिल्हा माओवादमुक्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने जिल्हाभरात 'माओवादमुक्त दिवाळी' साजरी करण्यात आली. पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी अतिदुर्गम बिनागुंडा येथे नागरिक आणि जवानांसोबत दिवाळीचा आनंद साजरा केला.

धाराशिव

पुण्यातील दि पूना मर्चंट चेंबर्स या व्यापारी संघटनेच्यावतीने येडशी येथील राजगोंड तसंच कुडमुडे जोशी समाजाच्या पालावर राहणाऱ्या कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आलं.

भेंडोळी उत्सव-धाराशिव

श्री क्षेत्र तुळजापूर इथं काळभैरवनाथांचा पारंपरिक भेंडोळी उत्सव काल रात्री उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. उत्सवानिमित्त श्री काळभैरव मंदिरासमोर पारंपरिक पद्धतीने भेंडोळीची बांधणी करून विधिवत पूजन आणि आरती करण्यात आली. त्यानंतर भेंडोळी प्रज्वलित करण्यात आली. शेकडो पुजारी बांधव प्रथेनुसार पेटती भेंडोळी खांद्यावर घेऊन श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिरात गेले. यावेळी 'आई राजा उदो उदो' आणि 'भैरवनाथ चांगभलं' या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला.

चिपीथेट विमानसेवा-सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्ह्यात चिपी विमानतळावरून नवी मुंबईसाठी 16 नोव्हेंबरपासून थेट विमानसेवा सुरू होणार आहे. फ्लाय 91 या विमान कंपनीने ही घोषणा केली असून, या सेवेसाठी तिकीट बुकिंग सुरू झाल आहे. या विमानसेवेमुळे सिंधुदुर्ग आणि मुंबईदरम्यानचा प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होणार असून, प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. या सेवेमुळे सिंधुदुर्गच्या पर्यटन व्यवसायालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

धरण साठा

राज्यातील धरणांमधील एकंदर उपयुक्त पाणीसाठा 65 पूर्णांक 79 टक्क्यांवर आला आहे. राज्यातील तीन हजार 42 प्रमुख, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये 26 हजार 979 दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध असल्याचं राज्य जलसंपदा विभागानं काल जारी केलेल्या अहवालात म्हटलं आहे. गेल्या वर्षी याच तारखेला धरणांमध्ये 90 टक्क्यांहून अधिक पाणीसाठा होता. त्या तुलनेत यावर्षी पाणीसाठ्यात सुमारे 25 टक्क्यांची घट नोंदवण्यात आली आहे. विभागनिहाय पाणीसाठ्याचा विचार करता, कोकण विभागात सर्वाधिक 83 टक्क्यांच्या वर पाणीसाठा असून त्याखालोखाल पुणे विभागात जवळपास 76 आणि नाशिक विभागात 75 टक्के पाणीसाठा आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वात कमी 38 पूर्णांक 39 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

निधन-हिंगोली

हिंगोली जिल्ह्यातील वसमत विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार, टोकाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक आणि बहिर्जी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मुंजाजीराव जाधव यांचं काल सकाळी नांदेड इथल्या खासगी रुग्णालयात निधन झालं. ते 91 वर्षांचे होते.

हवामान

येत्या 24 तासांत राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.